मा. उच्च न्यायालय, मुंबई व त्यांचे औरंगाबाद व नागपूर खंडपीठातील न्यायालयीन कामकाज व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे चालविण्याकरिता दि.०१.०४.२०२५ ते दि.३१.०३.२०२६ या कालावधीकरिता खरेदी केलेल्या ७० Zoom Licenses ची मुदत दि.०१.०४.२०२६ ते दि.३०.०६.२०२६ या कालावधीकरिता वाढविण्यास व त्याकरिता येणाऱ्या रु.४,१५,८५०/- (करांसहित) इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**विधि व न्याय विभाग,**

**शासन निर्णय क्र. संप्रिसा- २०२२/प्र.क्र.६३/का. ७**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**दिनांक : ०२ एप्रिल, २०२६.**

<u>संदर्भ:-</u> १) केंद्रीय प्रकल्प समन्वयक, ई-कोर्ट प्रकल्प, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. Com./Sec./७५/२०२६, दिनांक १८.०३.२०२६.

२) समक्रमांकाचा शासन निर्णय दि.१३.०२.२०२५.

३) समक्रमांकाचा शासन निर्णय दि.२१.०१.२०२६.

४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखंस २०१४/प्र.क्र.८२/भाग III/ उद्योग -४, दि.०१.१२.२०१६.

**<u>प्रस्तावना</u> :-**

संदर्भाधीन क्र.०२ येथील शासन मान्यतेनुसार, मा. उच्च न्यायालय, मुंबई व त्यांचे औरंगाबाद व नागपूर खंडपीठातील न्यायालयीन कामकाज व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे चालविण्याकरिता दि.०१.०४.२०२५ ते दि.३१.०३.२०२६ या कालावधीसाठी Perfect House Pvt.Ltd या पुरवठादाराकडून खरेदी केलेल्या ७० Zoom Licenses ची मुदत दि.३१.०३.२०२६ रोजी संपत आहे. त्यामुळे संदर्भ क्र.०३ येथील शासन निर्णयान्वये दिलेल्या मान्यतेनुसार, दि.०१.०४.२०२६ ते दि.३१.०३.२०२७ कालावधीकरिता Zoom Licenses चा पुरवठा व स्थापनेसाठी दि.०३.०२.२०२६ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रियेस तीन वेळा मुदतवाढ देवूनही एकच निविदा प्राप्त झाली असून, सदर निविदाकाराने तांत्रिक व पात्रता निकष पूर्ण केले नाहीत. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया रद्द केली आहे. सदर खरेदी प्रक्रिया पूर्ण होवून पुरवठादारास पुरवठा आदेश देण्यास काही कालावधी लागणार असल्याने, Perfect House Pvt.Ltd या पुरवठादाराकडून दि.०१.०४.२०२५ ते दि.३१.०३.२०२६ या कालावधीकरिता खरेदी केलेल्या ७० Zoom Licenses ची मुदत दि.०१.०४.२०२६ ते दि.३०.०६.२०२६ या कालावधीकरिता यापूर्वीच्याच दराने वाढविण्यास व त्याकरिता येणाऱ्या रु.४,१५,५८०/- (सर्व

करांसह) निधी मंजूर करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव केंद्रिय प्रकल्प समन्वयक, ई कोर्ट प्रकल्प, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे संदर्भाधीन क्र.०१ येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

सदर प्रस्तावांतर्गत खर्च रु.१० लक्ष पेक्षा कमी असल्याने, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भाधीन क्र.०४ येथील दिनांक ०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयासोबतच्या सुधारित नियम पुस्तिकेतील मुद्दा क्र.२.९.२ तरतूदीनुसार विभाग प्रमुखांना खरेदीसंबंधी प्रशासकीय विभागीय खरेदी समितीची बैठक न बोलविता निर्णय घेण्याचा अधिकार आहे. त्यानुसार उपरोक्त प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई व त्यांचे औरंगाबाद व नागपूर खंडपीठातील न्यायालयीन कामकाज व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे चालविण्याकरिता Perfect House Pvt.Ltd या पुरवठादाराकडून दि.०१.०४.२०२५ ते दि.३१.०३.२०२६ या कालावधीकरिता खरेदी केलेल्या ७० Zoom Licenses ची मुदत यापूर्वीच्याच दराने दि.०१.०४.२०२६ ते दि.३०.०६.२०२६ या कालावधीकरिता वाढविण्यास व त्याकरिता येणाऱ्या रु.४,१५,८५०/- (अक्षरी रुपये चार लक्ष पंधरा हजार आठशे पन्नास फक्त) (करांसह) इतक्या रकमेच्या खर्चास खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. अटी व शर्ती:-

१) उपरोक्त ७० Zoom Licenses ची मुदत दि.०१.०४.२०२६ ते दि.३०.०६.२०२६ या कालावधीकरिताच राहील.

२) सदर कालावधीत Zoom Licenses खरेदीची निविदा प्रक्रिया राबवून, पुरवठादार निश्चित करावा. व यासंदर्भात संदर्भाधिन क्र.३ येथील दि.२१.०१.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या मान्यतेनुसार कार्यवाही करावी.

३. याप्रित्यर्थ होणारा खर्च “मागणी क्र.जे-१, २०१४-न्यायदान, (००) १०२-उच्च न्यायालय, (०३) अपील शाखा, (०३) (०१) प्रबंधक अपील शाखा (भारित) लेखाशीर्ष (२०१४ ००९२)” अंतर्गत “१७-संगणक खर्च” या उदिष्टाखाली संबंधित वर्षात मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-१ उप विभाग-२ मधील अ. क्र. २७ (अ) नियम क्र. ७६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४०२१७५३४९८५१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHENDRA RAMCHANDRA JADHAV

Digitally signed by MAHENDRA RAMCHANDRA JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department,
2.5.4.20=3971EC243F15CD8A25BFD6DBAF74EFE04F80D57C22E473EB8EAAC7AC344AC25A, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=846337C71F3B3405F8D8448578B4ED3DDBE6ED2DB306E26977B3CDCCDDC27F14, cn=MAHENDRA RAMCHANDRA JADHAV
Date: 2026.04.02 17:54:49 +05'30'

**( महेंद्र जाधव )**
**विधि सल्लागार-नि-सह सचिव.**

**प्रति,**

१. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
२. केंद्रीय प्रकल्प समन्वयक, ई-कोर्ट प्रकल्प, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
३. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता),-१, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
४. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
५. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, ६ व ७ वा मजला अेपीजे हाऊस, दिनशॉ वांच्छा रोड, के. सी. कॉलेज जवळ, चर्चगेट, मुंबई-२०.
७. संचालक, लेखा व कोषागारे, ६ व ७ वा मजला अेपीजे हाऊस, दिनशॉ वांच्छा रोड, के. सी. कॉलेज जवळ,चर्चगेट, मुंबई-२०.
८. कार्यासन अधिकारी-४, १३, २३ व २४, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. निवड नस्ती/का. ७